MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

दिनांक १८-१२-२०१३
नागपूर

प्रति,
-----------------------
-----------------------
नागपूर.

**विषय : महानिर्मितीची वस्तुस्थितीदर्शक माहिती.**

संदर्भ : दैनिक लोकमत, नागपूर आवृत्तीत दिनांक १७ व १८ डिसेंबर, २०१३ मध्ये प्रसिध्द झालेले महाजेनकोविषयीचे विपर्यस्त वृत्त.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भानुसार दैनिक लोकमतमध्ये दिनांक १७ व १८ डिसेंबर, २०१३ मध्ये महाजेनकोविषयीचे विपर्यस्त वृत्त प्रसिध्द झालेले आहे. सदर वृत्त हे महानिर्मितीची बाजू समजून न घेता हेतूपुरस्पर एकांगी पध्दतीने प्रसारित करण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे दिनांक १७.१२.२०१३ रोजी महानिर्मितीने सविस्तर वृत्तपत्र खुलासा सदर वृत्तपत्राकडे पाठविल्यानंतर देखील त्याची दखल घेण्यात आली नाही. सदर वृत्तपत्राने वृत्तपत्रीय संकेतांचा भंग केल्याचे यावरुन स्पष्ट होते.

तथापि, सदर वृत्तमालिकेमुळे राज्यातील वीज ग्राहकांची दिशाभूल होवू नये तसेच ग्राहकांना प्रत्यक्ष वस्तुस्थितीची जाणीव करुन देण्याकरीता कृपया सोबत महानिर्मितीची वस्तुस्थितीदर्शक माहिती पाठवित आहे. ग्राहकहिताच्या दृष्टीकोनातून कृपया आपण त्यास योग्य ती प्रसिध्दी दयावी, ही नम्र विनंती.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी,
महानिर्मिती

----------

**: महानिर्मितीने दैनिक लोकमतकडे पाठविलेला खुलासा :**

सदर वृत्तात वृत्तप्रतिनिधीने महानिर्मितीच्या व्यवस्थापकीय संचालकांशी फोनवरुन वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असे नमुद केले आहे. तथापि सदर विधान हे चुकीचे असून सदर वृत्तप्रतिनिधीने महानिर्मितीच्या व्यवस्थापकीय संचालकांशी या विषयासंबंधात संभाषण साधण्याचा कोणताही प्रामाणिक प्रयत्न केलेला नाही, हे महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे. जर वेळीच हा संवाद घडला असता तर कदाचित असे खळबळजनक व सनसनाटी वृत्त प्रसिध्द करण्यात बाधा पोहचली असती असे सकृत दर्शनी स्पष्ट होते. तसेच या प्रकरणी महानिर्मितीची माहिती घेण्यासाठी महानिर्मितीच्या जनसंपर्क अधिकारी यांचेशी देखील संपर्क साधण्याचा कोणताही प्रयत्न सदर वृत्तप्रतिनिधीने कधीही केलेला नाही, ही खेदाची बाब आहे.

**तरी देखील वाचकांच्या मनात गैरसमज होऊ नये यासाठी खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.**

१. महानिर्मितीने पर्यावरणसंबंधी नियमांचा कधीही भंग केलेला नाही. महानिर्मिती ही प्रथम पासून पर्यावरणाचे संवर्धनास पोषक अशाच पध्दतीने वर्षानुवर्षे वीज निर्मिती करीत आहे. या संबंधी सदर वृत्तात नमूद करण्यात आलेल्या पर्यावरण व वनमंत्रालय यांच्या पर्यावरण संरक्षण नियमांबाबत वाचकांची दिशाभूल करण्यात आलेली आहे. धुतलेल्या कोळशाचा वापर महानिर्मितीला अनिवार्य नाही. तसेच प्रति किलो ४००० किलो कॅलरीज उष्मांकाचाच कोळसा वापरणे बंधनकारक नाही. एनटीपीसी या देशातील अग्रगण्य वीज कंपनीने देखील फक्त कच्च्या कोळशाचा वापर करुनच वीज निर्मिती केलेली आहे.

२. वापरण्यात येणाऱ्या कोळशातील राखेचे प्रमाण ३४% पेक्षा कमी राखण्यासाठी महानिर्मितीच्या काही विद्युत केंद्रामध्ये आवश्यकतेनुसार कच्च्या कोळशाबरोबर काही प्रमाणात उत्तम प्रतीचा आयात कोळसा मिश्रित करुन (Blending) वापरण्यात येतो. महानिर्मितीच्या कोराडी व चंद्रपूर येथील आगामी प्रकल्पांसाठी जे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे त्यानुसार कमी उष्मांकाच्या कोळशावर देखील वीज निर्मिती साध्य होणार आहे.

३. त्याचप्रमाणे नुतनीकरण व आधुनिकीकरण योजनेअंतर्गत (R&M) महानिर्मितीने कोराडी, चंद्रपूर, नाशिक, भुसावळ व परळी येथील एकूण ६ संचांचे काम करण्याचे नियोजन केले आहे. त्यापैकी कोराडी संचाच्या आधुनिकीकरणाचे काम सर्वप्रथम मार्गी लावण्यात येत आहे. तसेच सीपीआरआयचे शिफारशीनुसार नियामक आयोगाच्या मंजूरीनंतर अनेक सविस्तर प्रकल्प अहवालांची (D.P.R.) अंमलबजावणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. विद्युत केंद्रातील Electrostatic Precipitator यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित ठेवण्यासाठी महानिर्मितीचा कटाक्ष असतो. तसेच उत्सर्जन पातळी विहीत मर्यादेत ठेवण्यासाठी विदर्भातील कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रात अमोनिया डोझींग (A.F.G.) यंत्रणा कार्यान्वित केलेली आहे. आयुर्मान पूर्ण झालेले तसेच कालबाहय तंत्रज्ञानाचे महानिर्मितीचे काही जुने संच महानिर्मितीने सुमारे दोन वर्षापूर्वीच स्वत:हून बंद केलेले आहेत.

४. सदर वृत्तात चंद्रपूर परिसरातील प्रदुषणाविषयी महानिर्मितीवर काही एकांगी आरोप करण्यात आलेले असून ते चुकीचे आहेत. सदर परिसरातील प्रदुषणाबाबतची वस्तुस्थिती व इतर अनेक प्रदुषणकारी घटकांची कारणे व पृथक्करण करण्यासाठी निरी, आयआयटी या सारख्या काही प्रख्यात संस्था संशोधन करीत आहेत.

वस्तुत: वर्ष २०१०-११ मध्ये चंद्रपूर औष्णिक केंद्राला पाणीपुरवठा करणाऱ्या इरई धरणात पुरेसा पाणीसाठा नसल्याने तेव्हा काही महिन्यांसाठी चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र बंद ठेवावे लागले होते. चंद्रपूर परिसरातील एरवीच्या प्रदुषणाची पातळी व चंद्रपूर वीज केंद्र बंद असतांना त्या कालावधीतील प्रदुषणाची पातळी यात फरक नव्हता. यावरुन चंद्रपूर परिसरातील प्रदुषणास अन्य काही घटक जबाबदार आहेत, हे स्पष्ट होते.

५. महानिर्मितीला गेल्या काही वर्षांपासून प्राप्त होणाऱ्या कोळशाचा दर्जा अपेक्षित श्रेणीचा नसल्यामुळे तसेच प्राप्त कोळशाचे प्रमाणही कमी असल्याने महानिर्मितीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या संबंधी वारंवार पाठपूरावा करुन देखील सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने नाईलाजाने महानिर्मितीने सुमारे दोन वर्षापूर्वी भारतीय स्पर्धा आयोगाकडे (C.C.I.) याचिका दाखल केली होती. उल्लेखनिय बाब म्हणजे, नुकताच सदर याचिकेवरील स्पर्धा आयोगाचा आदेश जारी झाला असून त्यायोगे महानिर्मितीची भूमिका मान्य करण्यात आलेली आहे. सदर आदेशाचे संबंधितांकडून काटेकोर पालन झाल्यास आगामी काळात महानिर्मितीला होणाऱ्या कोळशाचा दर्जात व प्रमाणात सुधारणा होऊ शकते. त्याचप्रमाणे एका अन्य जनहित याचिकेवर निर्णय देतांना मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने कोळसा उतरविण्याचे ठिकाणी संयुक्त कोल सॅम्पलींग बाबत निर्देश संबंधीत कोळसा कंपनीस दिलेले असल्याने त्यानुसार देखील महानिर्मितीला आगामी काळात चांगल्या दर्जाचा कोळसा प्राप्त होणे अपेक्षित आहे.

६. प्राप्त कच्च्या कोळशाचा दर्जा समाधानकारक नसल्यामुळे तत्कालीन परिस्थितीत महानिर्मितीने रीतसर निविदा प्रक्रिया राबवून विविध कोल वॉशरीज्च्या माध्यमातून धुतलेला कोळसा वापरण्याची संकल्पना अंगीकारली होती. तथापि कालांतराने महानिर्मितीच्या असे निदर्शनास आले की, महानिर्मितीला पुरविण्यात येणाऱ्या वॉश कोलचा दर्जा देखील समाधानकारक नव्हता. वॉश कोल सर्किटमधील गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी तसेच करारातील अटी शर्तींचा वारंवार भंग होत असल्याने महानिर्मितीने संबंधीत वॉशरीधारकांशी सातत्याने संपर्क साधला. तथापि, कोल वॉशरीधारकांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने सरतेशेवटी महाजेनकोला ऑगस्ट - सप्टेंबर, २०११ पासून कोल वॉशरी सर्किट नाईलाजाने बंद करावे लागले. या संदर्भात नमुद करावेसे वाटते की, वॉश कोल वापरुन देखील महानिर्मितीच्या औष्णिक संचांच्या कामगिरीत अपेक्षित सुधारणा होत नव्हती. याउलट वॉश कोलचा वापर बंद केल्यानंतर महानिर्मितीचे व पर्यायाने वीज ग्राहकांचे होणारे मोठे आर्थिक नुकसान टळले व वॉश कोलचा वापर थांबविण्याचा महानिर्मितीचा निर्णय हा पूर्णतः ग्राहकांच्या हितांचा आहे हे सिध्द झाले. सदर बाब राज्य वीज नियामक आयोगाच्या देखील निदर्शनास आणून देण्यात आली होती.

७. विदर्भातील कोल वॉशरीज् बंद आहेत यासाठी महानिर्मिती जबाबदार नाही.

८. त्याचप्रमाणे वरील आवृत्तीत महाजेनकोच्या महागडया वीज खरेदीचाच आग्रह कां? या शिर्षकाचे पृष्ठ क्र. ५ वरील वृत्त देखील वस्तुस्थितीवर आधारीत नाही. सदर वृत्तात नमुद केलेल्या महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेला प्रत्यक्ष वस्तुस्थितीची पूर्णतः जाणीव असून देखील काही अंतस्थ हेतूने गेल्या काही काळापासून सातत्याने महानिर्मितीची वीज महाग आहे असा अपप्रचार सदर संघटना नाहक करत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, महानिर्मितीचा वीज दर हा राज्य वीज नियामक आयोगाकडून मंजूर करण्यात येत असतो. सध्या महानिर्मितीचा मंजूर वीज दर हा फक्त रु.३.०६/-प्रति युनिट इतका असतांनाही सदर वृत्तात महाजेनकोच्या साडे पाच-सहा रुपये प्रति युनिटदरापेक्षा बाजारात स्वस्तात वीज उपलब्ध असतांनाही महागडी वीज खरेदी करण्याचा महावितरणचा अट्टाहास कशासाठी असे विधान अंतर्भूत आहे. आजमितीला देखील महानिर्मितीची वीज ही अंतिमतः राज्यात सर्वात स्वस्त आहे ही वस्तुस्थिती आहे. वीज आयोगाकडून प्रति युनिट मंजूर झालेल्या दरानुसारच महानिर्मिती महावितरणला वीज आकारणी करत असते.

९. दैनिक लोकमत दिनांक १६ डिसेंबरच्या आवृत्तीत राज्यातील व विशेषतः विदर्भातील खाजगी वीज निर्मिती केंद्रे बंद पडण्यासंबंधीत वृत्त प्रसिध्द झालेले आहे. तसेच आज दिनांक १७ डिसेंबरच्या आवृत्तीतील वृत्तात **उद्या वाचा - मिळालेला कोळसा न उचलल्याने महाजेनकोचे ११ हजार कोटी रुपयांचे नुकसान** असे उद्याच्या अंकातील वृत्तासंबंधीचे विधान नमुद केले आहे.

या संबंधी महानिर्मिती आत्ताच स्पष्ट करु इच्छिते की, महानिर्मितीच्या वीज केंद्रांना कोळसा पुरवण्याची जबाबदारी ही महानिर्मितीची नसून पूर्णतः संबंधित कोळसा कंपनीचीच आहे. त्यामुळे महानिर्मितीने कोळसा उचलण्याचा व पर्यायाने कोणत्याही आर्थिक नुकसानीचा प्रश्नच उद्भवत नाही

महानिर्मितीचा वरील खुलासा लक्षात घेता महानिर्मितीवर असे नाहक बदनामीकारक आरोप कां केले जात आहेत या मागील कारणमिमांसा या पार्श्वभूमीवर पुरेशी स्पष्ट होते. अशा प्रकारच्या वृत्तांमागील बोलविता धनी कुणी वेगळाच आहे असा संशय घेण्यास निश्चितच जागा आहे.

१०. वरील सर्व माहिती व्यतिरीक्त आणखी काही वस्तुस्थिती संबंधीत वृत्तप्रतिनिधी यांना जाणून घ्यायची असल्यास त्यांनी यापूढे अशाप्रकारचे एकांगी वृत्त प्रसिध्द करण्यापूर्वी महानिर्मितीची बाजू पूर्णतः समजून घ्यावी अशी विनंती महानिर्मितीतर्फे करण्यात येत आहे. दैनिक लोकमत सारख्या अग्रगण्य वृत्तपत्राकडून चुकीचे वृत्त प्रसिध्द होऊ नये अशी महानिर्मितीची भूमिका आहे.

लोकमत

दिनांक : मंगळवार १७ डिसेंबर २०१३

# महाजेनकोच्या महागड्या वीज खरेदीचाच आग्रह का ?

मुंबई : राज्यात स्वस्तात वीज उपलब्ध असतानाही केवळ आपलाच भाग असलेल्या सरकारी कंपनीला तारायचे या अट्टाहासापोटी महावितरण महागड्या दराची वीज 'महाजेनको'कडून खरेदी करत असून, याचा भार ग्राहकांवर लादत आहे. वीज खरेदीसंदर्भात वीज कायद्याचा सोयीचा अर्थ काढून व्यवहार होत आहे, अशा स्पष्ट शब्दांत महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी महावितरणच्या एककल्ली धोरणाविषयी संताप व्यक्त केला. 'वीज प्रकल्प उभारुन आम्ही चूक केली का ?' हे वृत्त 'लोकमत'च्या अंकात ठळकपणे प्रसिद्ध होताच वीज ग्राहक संघटनेसंह औद्योगिक संघटनांनी या धोरणाच्या विरोधात स्पष्ट नाराजी व्यक्त केली आहे.

विदर्भात २१०० मेगावॅट क्षमतेचे सात प्रकल्प दोन वर्षांपासून बंद आहेत. त्यामुळे या उद्योजकांनी गुंतवलेल्या २० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर प्रश्नचिन्ह लागले आहे. त्यातच महावितरण या उद्योगांकडून एकिकडे करार नसल्याचे कारण पुढे करत वीज खरेदी करत नाही तर दुसरीकडे खुल्या बाजारात विकायची असेल तर नुकसानभरपाई म्हणून २ रुपये ७५ पैसे प्रति युनिट एवढा दंडही आकारत आहे. या कंपन्यांकडून वीज खरेदी होत नसली तरी महावितरण महाजनकोकडून महागड्या दराने वीज खरेदी करत असल्याचीही माहिती मिळत आहे. या संदर्भात प्रताप होगाडे यांनी सांगितले की, वीज कायद्याचा सोयीचा अर्थ घेत महावितरण वीज खरेदी करते. यामध्ये जरी सरकारी कंपनीकडून वीज खरेदी करण्याचा मुद्दा असला तरी, त्याचसोबत स्पर्धात्मक वातावरण तयार करणे, ग्राहक संरक्षणाचा विचार करणे, कार्यक्षमता वाढविणे ही देखील तत्वे आहेत. मात्र, या तत्वांचा अवलंब होताना दिसत नाही. महाजनकोच्या साडे पाच-सहा रुपये प्रति युनिटदरापेक्षा बाजारात स्वस्तात वीज उपलब्ध असतानाही महागडी वीज खरेदी करण्याचा महावितरणचा अट्टाहास कशासाठी ?, अर्थात महागडी वीज खरेदी करण्याचा महावितरणला काहीच तोटा नाही. कारण, हा सर्व भार ग्राहकाच्याच खिशातून वसूल केला जातो. वीज खरेदी करताना महावितरणकडून 'मेरिट ऑर्डर डिस्पॅच' या तत्वाकडे काणाडोळा करत असल्याचा दावाही होगाडे यांनी केला. (प्रतिनिधी)



### शासनाने विचार करावा

महावितरण खासगी उद्योजकांकडून वीज घेत नाही व ती खुल्या बाजारात विकायची असेल तर महावितरणला दंड द्यावा लागतो. यामुळे खासगी वीज उद्योजकांचे नुकसानच आहे. असेच सुरु राहिले तर त्यांना मोठा फटका सहन करावा लागेल व याचा फटका संपूर्ण उद्योगाला बसेल. शासनाने यासंदर्भात सकारात्मकपणे विचार करावा

-मयंक शुक्ला, अध्यक्ष, एमआयए इंडस्ट्रीज असोसिएशन

### उद्योजकांवर अन्यायच

विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनकडून या मुद्यावर सखोल विचार करण्यात येणार आहे. तसे पाहिले तर खासगी वीज प्रकल्पांतून वीज खरेदी करणे महावितरणला सहज शक्य आहे. यामुळे स्वस्त दरात वीज मिळू शकते. परंतु शासनाचे खासगी वीज उद्योजकांबाबतचे हे धोरण चुकीचेच आहे व हा या उत्पादकांवर एकाप्रकारे अन्यायच आहे.

-प्रफुल्ल दोशी, अध्यक्ष, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन

### स्पर्धेला मान्यता द्या

वीज क्षेत्रात महावितरणची 'मोनोपोली' आहे. एकतर्फी अटी लावून खासगी वीज उद्योजकांवर एका अर्थी अन्यायच झाला आहे. तसे पाहिले तर इतर क्षेत्रांप्रमाणे येथेदेखील स्पर्धेला मान्यता द्यायला हवी. खासगी वीज उत्पादकांची वीज स्वस्त आहे व त्यांची कार्यक्षमतादेखील चांगली आहे.

-हेमंत अंबासेलकर, अध्यक्ष, बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

लोकमत

दिनांक : बुधवार १८ डिसेंबर २०१३

# पूर्ण कोळसा उचलला नाही म्हणून ११ हजार कोटींचा फटका

## महाजेनकोने गमावला २८ दशलक्ष टन कोळसा: महावितरणवर ३१११ कोटींचा बोजा

सोपान पांढरीपांडे ● नागपूर

वीज क्षेत्रातील समस्या - अंतिम भाग



**एकीकडे** महाजेनकोने धुतलेल्या कोळशाचा वापर बंद केला आहे तर दुसरीकडे कोल इंडियाकडून मिळालेल्या 'लिंकेज'चा कोळसाही महाजेनको पूर्णपणे उचलत नाही. यामुळे गेल्या तीन वर्षात महाजेनको आणि महावितरण या दोन कंपन्यांवर ११ हजार कोटी रुपयाचा बोजा पडला आहे. हे कसे घडले ते मोठे रंजक आहे.

**परत गेला कोळसा**

२०१०-११ मध्ये महाजेनकोला कोल इंडियाकडून एकूण ३७.९३ दशलक्ष टन कोळसा मंजूर झाला होता. यापैकी महाजेनकोने ३२.१७ दशलक्ष टन कोळसा उचलला. ५.७० दशलक्ष टन कोळसा परत गेला. २०११-१२ साली ३९.५० दशलक्ष टन मंजूर कोळशापैकी महाजेनकोने फक्त २९.५७ दशलक्ष टन कोळसा उचलला. त्यामुळे ९.९२ दशलक्ष टन कोळसा परत गेला. गेल्या वर्षी २०१२-१३ मध्ये ४१.९६ दशलक्ष टन कोळसा मिळाला होता. त्यापैकी महाजेनकोने ३०.०५ दशलक्ष टन कोळसा घेतला. ११.९१ दशलक्ष टन कोळसा परत गेला. याप्रमाणे तीन वर्षात २७.६९ दशलक्ष टन कोळसा परत गेला. एवढ्या कोळशामध्ये १०४ मेगावॅट क्षमतेचा वीज प्रकल्प संपूर्ण वर्षभर चालू शकतो. मजेची बाब म्हणजे कोळसा परत गेल्याचा खुलासा महाजेनकोने स्वत:च मुंबई हायकोर्टात अनिल वडपल्लीवार यांच्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान सादर केलेल्या शपथपत्रात केला आहे.

**सार्वजनिक पैशाची उधळपट्टी**

◆ महाजेनको किंवा महावितरण यांनी खर्च केलेले ११ हजार कोटी रुपये हे करदात्यांचे सार्वजनिक पैसे आहेत. त्याची उधळपट्टी थांबवणे आवश्यक आहे.

**महाजेनकोचे नुकसान ४७४० कोटी रु.**

कोळसा साठा परत गेल्यामुळे महाजेनको जेवढी वीज निर्मिती करु शकली नाही त्या विजेचा सर्वात माफक दीड रुपया दर लावला तरी तीन वर्षात ४७४० कोटी रुपये होतात. हे महाजेनकोचे अप्रत्यक्ष नुकसान आहे.

**विदेशी कोळशापोटी २९४७ कोटी रुपयांचे नुकसान**

मंजूर कोळसा उचलला नाही व वॉशरीकडून कोळसा घेणे बंद केले यामुळे » पान/७

# पूर्ण कोळसा उचलला नाही म्हणून ११ हजार कोटींचा फटका

(पान १ वरुन)

कोळशाचा तुटवडा झाला. तो भरून काढण्यासाठी महाजेनकोने ८.७३ दशलक्ष टन कोळसा या तीन वर्षात विदेशातून मागवला. भारतात कोळशाचे भाव या तीन वर्षात प्रति टन १८२५ ते २३८५ रुपये होते तर इंपोर्टेड कोळसा कारखान्यात येईपर्यंत ६४९३ ते ७०८६ प्रति टन या भावात पडत होता. या महागड्या कोळशामुळे महाजेनकोवर तीन वर्षात २९४७ कोटी रुपये बोजा पडला. ही बाब महाजेनकोने कॉंपिटिशन कमिशनला सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

**महावितरणचे नुकसान ३१११ कोटी रु.**

महाजेनकोकडून वीज मिळाली नाही म्हणून महावितरणला एनटीपीसीच्या कावस, सीपत , गांधार इत्यादी प्रकल्पातून २ रुपये ५० पैसे ते ५ रुपये ८७ पैसे अशा चढ्या दरात वीज खरेदी करावी लागली. या विजेपोटी एनटीपीसीला तीन वर्षात ३१११ कोटी रुपयाचा अधिक खर्च करावा लागला. ही बाब महाजेनकोने २०१२-१३च्या 'टॅरिफ डिटरमिनेशन'च्या वीज नियामक आयोगापुढील सुनावणीदरम्यान पुढे आली.

**उद्योगांचे पलायन**

विदर्भात कोळसा साठा असल्यामुळे वीज प्रकल्प इथेच होऊ शकतात. आजमितीला सरकारी आणि खासगी क्षेत्र जवळपास आठ हजार मेगावॅट वीज विदर्भात निर्माण होते. भविष्यात आणखी प्रकल्प येण्याची शक्यता आहे. आज महाराष्ट्रात उद्योगांना आठ रुपये प्रति युनिटप्रमाणे वीज घ्यावी लागते. शेजारच्या छत्तीसगडमध्ये ४ रुपये ८० पैसे हा दर आहे. त्यामुळे उद्योगांचे छत्तीसगडमध्ये पलायन सुरु झाले आहे. विदर्भातील खासगी वीज उत्पादक विजेचे दर पाच रुपये युनिटपेक्षा कमी होऊ शकतात असे आत्मविश्वासाने सांगतात. त्यांचा दावा आहे की, आम्हाला नियमित कोळसा पुरवठ्याची हमी हवी आहे. यासोबतच वीज विकत घेण्याची गॅरंटी सरकारने घ्यावी, भू संपादन आणि मायनिंग लिज त्वरित मिळेल अशी व्यवस्था हवी आहे. सरकारने हे केले तर आम्ही पाच रुपयापेक्षा कमी दरात वीज देऊ असे उद्योगपती म्हणतात. विदर्भाच्या विकासासाठी राज्य सरकार हे मान्य करील काय हे बघायचे.

लोकमत
दिनांक : मंगळवार १७ डिसेंबर २०१३

**विदर्भात एकूण १३ वॉशरी बंद : दोन वर्षांपासून धुतलेल्या कोळशाचा वापर बंद**

# पर्यावरणाचे नियम तोडून महाजेनको जाळते कच्च्या कोळसा

**सोपान पांढरीपांडे ● नागपूर**

केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालय यांच्या पर्यावरण संरक्षण नियमांना धाब्यावर बसवून महाजेनको ही महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी आपल्या वीज केंद्रांमध्ये उद्दामपणे कच्चा कोळसा जाळत आहे. हा प्रकार गेल्या दोन वर्षापासून सुरु आहे.

विदर्भात एकूण १३ वॉशरीज आहेत. त्या महाजेनकोसाठी कोळसा धुण्याचे काम करतात. महाजेनकोने ऑगस्ट-सप्टेंबर २०११ पासून धुतलेला कोळसा घेणे बंद केले. त्यामुळे या साऱ्या वॉशरीज दोन वर्षापासून बंद आहेत. खासगी वीज केंद्रे बंद आहेत, महाजेनकोनेही धुतलेला कोळसा घेणे बंद केले त्यामुळे कात्रीत सापडलेल्या वॉशरीवाल्यांपुढे कारखाना बंद करण्याशिवाय पर्याय उरला नव्हता.

## या प्रश्नांची उत्तरे द्या

- शर्मा यांनी लोकमतशी बोलायचे टाळले. त्यामुळे आता पुढील तीन प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून अपेक्षित आहेत.

१. कच्चा कोळसा जाळण्याचे महाजेनको समर्थन कसे करते?

२. १ जानेवारीपासून ३४ टक्क्यापेक्षा कमी राख व चार हजार कॅलरी उष्मांक असलेला कोळसा वापरावा लागणार याबद्दल महाजेनकोने काय तयारी केली?

३. विदर्भातील पर्यावरण हानी टाळण्यासाठी जनआरोग्याच्या हितामध्ये धुतलेला कोळसा वापरणे महाजेनको सुरु करणार की नाही ?

**वीज क्षेत्रातील समस्या - भाग २**



महाजेनकोच्या महागड्या वीज खरेदीचाच आग्रह का ?/ पान ५

**नियमांची बेधडक पायमल्ली**

पर्यावरण आणि वन मंत्रालयाने १७ सप्टेंबर १९९७ ला जीएसआर-५६० (ई) आणि ३० जून १९९८ ला जीएसआर ३७८ (ई)नुसार ३४ टक्केपर्यंत राख असलेला कोळसा वापरायचे बंधन वीज उत्पादकांवर टाकले होते. या नियमात सुधारणा करून ११ जुलै २०१२ च्या जीएसआर ५५२ (ई) प्रमाणे आता सर्व वीज केंद्रांना १ जानेवारी २०१४ पासून किमान चार हजार कॅलरी प्रति किलो एवढा उष्मांक असलेला कोळसा वापरण्याचे बंधन घातले आहे. महाजेनकोने या सर्व नियमांची दोन वर्षांपासून बेधडक पायमल्ली चालवली आहे. या बाबतीत महाजेनकोचे प्रबंध संचालक आशिषकुमार शर्मा यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी याविषयी बोलायचे सोडून फोन बंद करणे पसंत केले. यानंतर वारंवार फोन केला असता फोन 'स्विच ऑफ' असल्याचे उत्तर मिळत होते.

शर्मा बोलले नाहीत तरी महाजेनकोचे अधिकारी वॉशरीवाल्यांबाबत नेहमी नाराजी व्यक्त करीत आले आहेत. वॉशरीवाले प्रामाणिकपणे कोळसा धूत नाहीत, न धुतलेला आणि ४०-५० टक्केपर्यंत राख असलेला कोळसा आम्हाला देतात. त्यामुळे वीज संयंत्रांची दुरुस्ती आणि देखभाल खर्च प्रचंड वाढला » वृत्त/७

# नियम तोडून महाजेनको जाळते कच्च्या कोळसा

**पान १ वरुन**

आणि त्यामुळे महाजेनकोने वॉशरीवाल्यांकडून कोळसा घेणे बंद केले असे हे अधिकारी म्हणतात.

**वॉशरीवाल्यांची बाजू**

वॉशरीवाले मात्र हे आरोप नाकारताना म्हणतात की, ''आम्हाला खाणींतूनच ४०ते ५० टक्के राख असलेला कोळसा मिळतो. एक टक्का राख कमी करायची असेल तर अडीच टक्के कोळसा वाया जातो. महाजेनकोने आम्हाला वाया जाणारा कोळसा फक्त १५ टक्के असावा असे बंधन घालून दिले आहे. त्यामुळे त्या मर्यादित आम्ही राखेचे प्रमाण फक्त सहा टक्के कमी करू शकतो. महाजेनको ही वस्तुस्थिती कधीच लक्षात घेत नाही'' असे वॉशरीवाल्यांचे म्हणणे आहे.

**विदर्भाच्या पर्यावरणाची हानी**

विदर्भात महाजेनकोची खापरखेडा, कोराडी, चंद्रपूर आणि पारस अशी चार वीज केंद्रे आहेत. त्यांची उत्पादन क्षमता एकूण सहा हजार मेगावॅटची आहे. न धुतलेला कोळसा वापरल्यामुळे महाजेनको या सर्व केंद्रांच्या गावांतील पर्यावरणाला क्षती पोचवत आहे.

**चंद्रपूरचे सर्वाधिक नुकसान**

चंद्रपूर शहर हे भारतातील चौथ्या क्रमांकाचे सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून घोषित झाले आहे. महाजेनकोचा सर्वात मोठा २३४० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प चक्क चंद्रपूर शहराला लागून आहे. एकूण सात संचांमध्ये महाजेनको न धुतलेला कोळसा वापरते आहे. यामुळे आधीच प्रदूषित असलेल्या चंद्रपूरचे सर्वाधिक नुकसान महाजेनको करीत आहे. यावरून महाजेनको जनस्वास्थ्याबद्दल किती उदासीन आहे हेही दिसून येते.

**उद्या वाचा**

मिळालेला कोळसा न उचलल्याने महाजेनकोचे ११ हजार कोटी रुपयांचे नुकसान. वीज दरवाढ अटळ.

संकलन :- अरविंद कुकडे, जनसंपर्क विभाग, उप मुख्य अभियंता (लेखा व चाचणी) कार्यालय, नागपूर